|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

*Affiliation* (संलगता विभाग)

जा.क्र. कबचौउमवि /५/संलगता/३०५ /२०२० दि. १८.११.२०२०

**महत्वाचे (संकेतस्थळावर)**

**प्रति,**

**०१) मा.अध्यक्ष/सचिव,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी**
**संलग्नीत कायमस्वरुपी विनाअनुदानित फक्त कला, वाणिज्य व विज्ञान तसेच विधी, शिक्षणशास्त्र व समाजकार्य महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांना..**

**०२) मा.प्राचार्य व परिसंस्थांचे मा.संचालक यांना..**

**विषय :-** संलग्नीकरणाचे नुतनीकरण न केलेल्या, संलग्नीकरण शुल्क न भरलेल्या, विद्यार्थी प्रवेशास मनाई करण्यात आलेल्या कायम विनाअनुदानित महाविद्यालये/परिसंस्था यांची माहिती सादर करणेबाबत..

**महोदय/महोदया,**

वरील विषयास अनुसरुन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत काही महाविद्यालयांना/परिसंस्थांना शासनाने कायम विनाअनुदानित तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. शासनाच्या परवानगीच्या अधिन राहून विद्यापीठाने प्रथम संलग्नता प्रदान केलेली काही तसेच वेळोवेळी प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने संलग्नीकरणाचे नुतनीकरणास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की, कायम विनाअनुदान महाविद्यालयांना शासनाने/विद्यापीठाने परवानगी दिल्यानंतर महाविद्यालयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदींच्या अनुषंगाने संलग्नीकरणाचे नुतनीकरण दरवर्षी करुन घेणे आवश्यक असून बंधनकारक आहे. परंतु काही महाविद्यालये एकतर बंद आहेत किंवा दरवर्षी फक्त संलग्नता शुल्क भरुन संलग्नतेचे नुतनीकरण करुन घेतात मात्र महाविद्यालयात विद्यार्थी प्रवेशित केले जात नाहीत. काही महाविद्यालये प्रथम संलग्नीकरण मिळाल्यानंतर आजही बंद अवस्थेत आहेत. या संदर्भात शासनाकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून अशा महाविद्यालया बाबतीत कठोर कारवाई करणेबाबत वेळोवेळी निर्देश दिले गेले आहेत.

**(कृ.मा.प.)**

त्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या तक्त्यात फक्त कायम विनाअनुदानित महाविद्यालयांची संलग्नीकरणाचे नुतनीकरण, संलग्नता शुल्क, विद्यार्थी प्रवेशास मनाई इ. बाबतची माहिती affiliation.nmu@gmail.com या मेलव्दारे विद्यापीठास त्वरीत सादर करावी.

तसेच काही महाविद्यालये/परिसंस्थांकडून नियमित संलग्नता शुल्क भरण्यात येत नसल्यामुळे संलग्नता शुल्क प्रलंबित असल्याचे दिसून येते. त्यामुळे अंतर्गत लेखापरिक्षक तसेच महालेखाकार कार्यालयाकडून आक्षेप नोंदविलेला असून प्रलंबित संलग्नीकरण शुल्क वसुल करणेबाबतची आदेश दिलेले आहेत. तेव्हा आजपर्यत संलग्नीकरण शुल्क आणि त्यावर आजपर्यंतचे दंड यासह प्रलंबित शुल्क त्वरीत विद्यापीठाच्या संलग्नता विभागाकडे वित्त व लेखाधिकारी यांचे नावे धनाकर्षाव्दारे जमा करण्यात यावे.

याव्दारे असेही कळविण्यात येते की, ज्या संस्थेला महाविद्यालय/परिसंस्था बंद करावयाचे आहे, अशा संस्थांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १२१ प्रमाणे कार्यवाही करुन दि.०१ ऑगष्ट किंवा त्यापूर्वी महाविद्यालय/परिसंस्था बंद करणेबाबतचा प्रस्ताव विद्यापीठा मार्फत शासनाला सादर करावा.

**माहितीसोबत खालील दस्तऐवज सादर करणे आवश्यक आहे.**

०१) महाविद्यालय/परिसंस्था सुरु करण्यासाठी शासनाने परवानगी दिल्याबाबतचा शासन निर्णय.
०२) विद्यापीठाचे प्रथम संलग्नीकरण पत्राची छायांकित सत्यप्रत.
०३) दरवर्षी संलग्नीकरणाचे नुतनीकरण केल्याबाबतच्या पत्राची छायांकित सत्यप्रती.
०४) आतापर्यत भरलेले संलग्नता शुल्काची पावतीची छायांकित प्रती.
०५) विद्यार्थी प्रवेशास मनाई केलेली असल्यास पत्राची छायांकित प्रत.
०६) प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी वरीलप्रमाणे माहिती Excell Sheet मध्ये DVBTT Dhru या Font मध्ये सादर करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
Sd/-
सहा.कुलसचिव
(संलग्नता विभाग)

सोबत :- महाविद्यालयाबाबत सादर करावयाच्या माहितीचा तक्ता.

**प्रत :-** कबचौउमविशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**
०१) मा.कुलगुरु कार्यालय ०२) मा.प्र.कुलगुरु कार्यालय ०३) मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

# कायम विनाअनुदानित कला,वाणिज्य व विज्ञान तसेच विधी, शिक्षणशास्त्रे, समाजकार्य महाविद्यालये/परिसंस्था माहितीचा तक्ता

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | महाविद्यालयाचे नाव व स्थापना वर्ष | संस्थेचा व महाविद्यालयाचा दुरध्वनी क्रमांक व प्राचार्यांचे नाव | विद्याशाखा कला/वाणिज्य/विज्ञान | तुकडी | विद्यार्थी संख्या | नॅक/ नॅक पूर्नमूल्यांकन | शिक्षक | शिक्षकेत्तर कर्मचारी | शासनाने परवानगी दिल्यबाबतचा शासन निर्णय व दिनांक | विद्यापीठाची दरवर्षी संलग्नता घेतली आहे काय ? | महाविद्यालय/ परिसंस्था बंद केली असल्यास कोणत्या वर्षी प्रस्ताव सादर केला ते वर्ष | संलग्नता शुल्क थकित असल्यास केव्हापासून आणि भरावयाची संलग्नता शुल्क | विद्यार्थी प्रवेशास मनाई केली आहे काय ? (No Admission) शैक्षणिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |

सदरची माहिती Excell Sheet मध्ये DVBTT Dhru या Font मध्ये पाठवावी.

महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक यांची स्वाक्षरी व शिक्का

संस्था अध्यक्ष यांची स्वाक्षरी व शिक्का